श्री.लोळगे विशाल सुहास, कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती श्रीगोंदा, हे कार्यालयीन कामी अनाधिकृत गैरहजर असलेने त्यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करणे बाबत..

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश जा.क्र.साप्रवि/आस्था-३/२२६४२५१/२०३/२०२६
अहिल्यानगर दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेनुसार

वाचा:- १. गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा यांचेकडील पत्र क्र.आस्था-२/७८६/२०२३ दिनांक ०१/०८/२०२२
२. या कार्यालयाकडील ज्ञापन/दोषारोपपत्र जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/३३२२/८५/२०२३ दिनांक १८/०१/२०२३
३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा यांचेकडील पत्र क्र.आस्था-१/२३१/२०२३ दिनांक २१/०२/२०२३ समवेत नोंदणीकृत डाकेची पोहोच
४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा यांचेकडील पत्र.क्र.आस्था१/२६४/२०२४ दिनांक ०२/०२/२०२४
५. इकडील आदेश जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/६५२२/२८०/२०२४ दिनांक १४/०२/२०२४
६. सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक, यांचेकडील विभागीय चौकशी अहवाल जा.क्र.विशा.४/खाचौ/सी.आर.२२/२०२४ दिनांक २०/०६/२०२५
७. इकडील अंतिम कारणे दाखवा नोटीस जा.क्र. साप्रवि/आस्था-३/२२६४२५१/८८७/२०२५ दिनांक १८/११/२०२५
८. गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा यांचेकडील अहवाल जा.क्र.आस्था-१/ कावि/९४७/२३/२०२६ दिनांक ०९/०१/२०२६
९. गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा यांचेकडील अहवाल जा.क्र.आस्था-१/ कावि/१४७/२०२६ दिनांक १७/०३/२०२६
१०. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (६)

श्री.लोळगे विशाल सुहास, कनिष्ठ सहाय्यक, हे पंचायत समिती श्रीगोंदा येथे कार्यरत असताना कार्यालयीन कामी अनाधिकृत गैरहजर असलेने संदर्भ क्रमांक २ नुसार श्री.लोळगे यांना दोषारोपपत्र बजावणेत येऊन खुलासा सादर करणेबाबत कळविणेत आलेले होते. सदर दोषारोपपत्राचा श्री. लोळगे यांनी खुलासा सादर न केलेने त्यामुळे संदर्भ क्र.५ नुसार, प्रकरणी श्री लोळगे यांचे विरुध्द विभागीय चौकशी सुरु करणेत आली. संदर्भ क्र.६ चे सहाय्यक आयुक्त (चौकशी), नाशिक विभाग नाशिक, यांचेकडील चौकशी पुर्ण होऊन चौकशी अहवाल या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. सदर चौकशी अहवालात श्री लोळगे यांचे विरुध्द ठेवणेत आलेले दोनही आरोप सिध्द होत असलेचे निष्कर्ष प्राप्त झाले.

सदरचे चौकशी अहवालानुसार श्री.लोळगे विशाल सुहास, कनिष्ठ सहाय्यक यांना संदर्भ क्रमांक ७ नुसार अंतिम कारणे दाखवा नोटीस देणेत आली. संदर्भ क्रमांक ८ नुसार गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा, यांचेकडील अहवाल प्राप्त झालेला असुन सदर अहवालात श्री.लोळगे यांनी सदरची नोटीस स्विकारणेस नकार दिल्याचे नमुद केलेले आहे. व प्रकरणी केलेला पंचनामा या कार्यालयास सादर केलेला आहे. श्री.लोळगे यांनी अंतिम कारणे दाखवा नोटीस न स्विकारुन वरिष्ठांच्या आदेशाचे अवमान केलेचे सिध्द झालेले आहे. तसेच संदर्भ क्रमांक ९ नुसार गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा यांनी पुनश्च: अहवाल सादर करुन श्री.लोळगे हे आज अखेर पर्यंत अनाधिकृत गैरहजर आहेत तसेच श्री.लोळगे यांनी अद्यापपर्यंत म्हणणे सादर केले नसलेचे कळविलेले आहे.

..२

तरी श्री.लोळगे यांनी अंतिम कारणे दाखवा नोटीस स्विकारली नाही व अंतिम कारणे दाखवा नोटीसीस खुलासा सादर केलेला नाही. तसेच श्री.लोळगे यांचेवर ठेवणेत आलेले दोनही आरोप सिध्द होत आहेत. गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा यांचेकडील संदर्भ क्रमांक ९ च्या अहवालानुसार श्री.लोळगे हे अद्यापर्यंत कार्यालयीन कामी हजर नाही तसेच खुलासा सादर केलेला नाही. यावरुन श्री लोळगे यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केल्याने ते शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरत असलेचे या प्राधिकरणाचे मत आहे. सबब, श्री.लोळगे यांनी कार्यालयीन कामी अनाधिकृत गैरहजर राहुन महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केल्याने अंतिम कारणे दाखवा नोटीसीमध्ये नमुद केलेली महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (६) मधील तरतुदीनुसार श्री.लोळगे विशाल सुहास, कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती श्रीगोंदा यांना सेवेतुन काढुन टाकणे ही शिक्षा या आदेशाव्दारे अंतिम करण्यात येत आहे.

सदरच्या आदेशाची नोंद श्री.लोळगे विशाल सुहास, कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती श्रीगोंदा यांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक ....20260416040065.... असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 16-04-2026 17:57:19

(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री.लोळगे विशाल सुहास, कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती श्रीगोंदा

द्वारा व प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा

२/- सदरचा आदेश श्री.लोळगे विशाल सुहास, कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती श्रीगोंदा यांना बजावून दुस-या प्रतीवर त्यांची स्वाक्षरी घेवून या कार्यालयास सादर करावी व सदर आदेशाची नोंद संबधितांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा.

प्रत:- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत:- निवड नस्ती

स्वाक्षरीत/--
(आनंद भंडारी,भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर